आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेल आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही. त्यामुळे माहिती देता आलेली नाही. अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केल्यास त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे मागणी केलेली माहिती पुनःश्च अवलोकनाकरिता उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. त्या नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे

अवलोकन करणेबाबत सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करण्याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2608 दिनांक : 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -३१३९/२०२१

श्री.मोहम्मद रफिक अब्दुल शुकूर,
रा.मगदूम नगर, शिवाजी नगर, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १६.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.माधव पि.शंकरराव बाशेट्टी केस नं.डी.डी./टी.सी.एस.सी./एन.ऐ.एन/एल.ई.आर/११२/२००१/७५७१, दिनांक २५.०६.२००१, श्री.एस.बी.मोरे, एम.के.बोधगिरे, रामा दशरथ सिंदमवार, आर.जी.झंपलवाड, सि.जी.चिंतावार, एस.जी.नागलवार यांचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले एसटी जमातीचे वैधता प्रमाणपत्रासाठी जे कागदपत्र दिले त्या कागदपत्राची छायांकित प्रत व जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत द्यावे, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कलम ८ पोटकलम (त्र) मधील लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्‌भवलेल्या वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने मागिविलेली माहिती अर्जदारास देता नाही, म्हणून अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१२.०१.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०३.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाची माहिती मागितलेली असुन सदर माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी

यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **फक्त जात वैधता प्रमाणपत्राची (प्रत) माहिती** (त्रयस्थपक्षाने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेली अनुषंगिक कागदपत्रांची माहिती वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2607 दिनांक : 05/03/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -४३६६/२०२१

श्री.केरबा नागोजी जेटेवाड,
रा.वसंतराव नाईक कॉलेज समोर, तिरुमला निवास, एनडी-४२, डी-४-१३/२, सिडको, नांदेड, ता.जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २२.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, मा.दिनकर पावरा साहेब सहआयुक्त यांचे कालावधीत आंध समाजाचे बांधवाचे व महिला यांचे प्रवेश निर्गमला हिंदु अशी नोंद किंवा हिंदु आंध अशा नोंदी असणाऱ्यांना प्रमाणपत्र वैधता दिलेल्या आहेत त्यांच्या छायांकित प्रती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.०९.१२.२०२० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन, माहिती अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करुन प्रथम अपील अंशत: मंजूर केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचे अवलोकन करण्याकरिता संधी देण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केले असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेल आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही. त्यामुळे माहिती देता आलेली नाही. अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केल्यास त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे मागणी केलेली माहिती पुन:श्च अवलोकनाकरिता उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. त्या नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणेबाबत सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करण्याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६७७ दिनांक : ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७७६७/२०२१

श्री.मनोहर एम.धकाते,
रा.कलाकुंज, सरकार नगर, पाण्याच्या टाकीजवळ, मुल रोड,
चंद्रपूर ४४२४०१ — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.दिनकर पावरा, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी नियुक्तीच्या वेळेस सादर केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी; शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, सेवा पुस्तिकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स, नियुक्तीचे आदेशाची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कलम ८ पोटकलम (त्र) मधील लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने मागिविलेली माहिती अर्जदारास देता नाही, म्हणून अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.२६.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाची माहिती मागितलेली असुन सदर माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपिलकर्त्याचे म्हणणे पुराव्यासहित सादर केले त्याची नोंद न घेता मागणी केलेले सार्वजनिक दस्तावेज नाकारल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती म्हणजे **नियुक्ती आदेशाची प्रत व नियुक्तीच्यावेळी त्रयस्थपक्षाने सादर केलेल्या प्रमाणपत्राची फक्त यादी**, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६८२ दिनांक :- ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९०२/२०२१

श्री.धनंजय बाबुराव निरडे,
रा.योगेश्वरी कॉलेजच्या पाठीमागे, बालाघाट नगर, अंबाजोगाई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०४.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, अनुसूचित जमातीतील कोळी महादेव जमातीच्या न्यायालयाच्या आदेशान्वये दिल्या गेलेल्या वैधता प्रमाणपत्र धारकांच्या संपूर्ण नस्ती मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन कोणत्या उमेदवाराची माहिती हवी आहे याचा बोध होत नाही, म्हणून उमेदवाराचे नाव, वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक अर्जामध्ये नमूद करावा जेणेकरुन माहिती देणे सोईचे होईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे नेमका संदर्भ उपलब्ध करुन देणेबाबत अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी असा संदर्भ उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन ती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी त्रयस्थपक्षाच्या फक्त वैधता प्रमाणपत्राची प्रत (त्रयस्थपक्षाने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेली वैयक्तिक तपशिलाबाबतची अनुषंगिक कागदपत्रे वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा नेमका संदर्भ उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (फक्त वैधता प्रमाणपत्राची प्रत) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २८८१ दिनांक : ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१००२०/२०२१**

श्री.किसन ठोंबरे,
रा.शिवप्रस्थ हाईट्स, जी-४, तळमजला, स.नं.५३/१/१, धारेश्वर मंदिरा शेजारी, कामठे गल्ली, धावरी, पुणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १२.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, माननीय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे छत्रपती संभाजीनगर येथील अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे मा.अध्यक्ष म्हणून असलेल्या प्रत्यक्ष कामकाजातील सहभागाची व मा.अध्यक्ष म्हणून प्रत्यक्षपणे अर्जदारांच्या दाव्यांच्या दैनंदिन सुनावणीमध्ये घेत असलेल्या सहभागाची व छत्रपती संभाजीनगर येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची अधिकृत माहिती सहा मुद्यांवर मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र.१ ते ६ च्या संदर्भातील माहिती कार्यालयाच्या अभिलेख कक्षामध्ये उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, कार्यालयातील संबंधित कार्यासनांना विचारणा करुन माहिती उपलब्ध झाल्यास मुद्देनिहाय माहिती विहित तरतुदीनुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तसे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती लपवून ठेवली, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर

विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- २६८० दिनांक :- ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१०४५४/२०२१

श्री.अशरफ खान इस्माईल खान,
रा.रेल्वेस्टेशन, जहाँगीरदार कॉलनी, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सदस्य सचिव,
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर, सामाजिक न्याय भवन, इमारत अे विंग, पहिला मजला, शिवाजी हायस्कूलच्या शेजारी, शासकीय दुध डेअरी परिसर, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर, सामाजिक न्याय भवन, इमारत अे विंग, पहिला मजला, शिवाजी हायस्कूलच्या शेजारी, शासकीय दुध डेअरी परिसर, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०२.११.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, सोबत जोडलेल्या सय्यद जमशेद सय्यद अजमेर यांनी सदरील जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी सादर केलेल्या संपूर्ण संचिकेची सत्य छायांकित प्रत देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील संचिकेचा शोध घेतला असता आढळुन येत नाही, तथापि सदरील संचिका शोधण्याचे काम चालू असुन संचिका प्राप्त होताच अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.१२.२०२० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती देत नाहीत, उडवाउडवीचे कारणे देऊन पत्र देत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहिती मागितलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी फक्त जात वैधता प्रमाणपत्राची (प्रत) माहिती (त्रयस्थपक्षाने वैधता प्रमाणपत्र

मिळण्याकरिता सादर केलेली वैयक्तिक तपशिलाबाबतची अनुषंगिक कागदपत्रे वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-2679- दिनांक :-06/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर, सामाजिक न्याय भवन, इमारत अे विंग, पहिला मजला, शिवाजी हायस्कूलच्या शेजारी, शासकीय दुध डेअरी परिसर, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -११६६७/२०२१

श्री.बालासाहेब शंकर धबाले,
रा.भारस्वाडा, ता.जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, रामकिशन बाबुराव शिंदे रा.भारस्वाडा ता.जि.परभणी यांनी आदिवासी विकास विभाग सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जाती जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडुन सन २०११ मध्ये जातपडताळणी प्रमाणपत्र दिले, रामकिसन बाबुराव शिंदे यांनी दिलेले सर्व कागदपत्रे छायांकित प्रत देण्यात यावी, जात पडताळणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत देणे, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, श्री.रामकिशन शिंदे यांच्या मुळ नस्तीचा अभिलेख कक्षामध्ये शोध घेतला असता नस्ती आढळुन आलेली नाही, करिता वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक उपलब्ध करुन द्यावा जेणे करुन माहिती देणे सोईचे होईल, असे अपिलार्थी यांना कळवून माहिती अर्ज निकाली काढलेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२०.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील अंशत: मंजूर केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०६.१२.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना ९७ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन नेमका संदर्भ उपलब्ध करुन देणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयानुसार दि.०६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ९७ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय

अपील दाखल करताना त्यामध्ये प्रयोजन नमूद केलेले नाही. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी त्रयस्थपक्षाच्या फक्त वैधता प्रमाणपत्राची प्रत (त्रयस्थपक्षाने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेली वैयक्तिक तपशिलाबाबतची अनुषंगिक कागदपत्रे वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2678 दिनांक : 06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -११८०२/२०२१**

श्री.उत्कर्ष यशवंत दांडगे,
रा.फुलेनगर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २३.०३.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, अ. Case No.DD/TCSC/NSK/SSD-1512 Date 20.10.1997 या जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत देण्यात यावी, ब. सदरील जात वैधता प्रमाणपत्र घेण्यासाठी जे-जे कागदपत्र दिलेले आहे त्याच्या साक्षांकित केलेल्या प्रती देण्यात याव्यात, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, केस नंबर वरुन माहितीचा शोध घेता येत नाही त्याकरिता उमेदवाराचे नाव व वैध, अवैध, खारीज बाबत तपशिल दिल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.०९.२०२१ रोजी ९० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०१.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आवश्यक माहितीकरिता रु.६७०/- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.१०.२०२१ रोजी अपिलार्थी यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.०४.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती संकलित करुन अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिलेली माहिती

चुकीची असुन श्री.रविंद्र प्रभाकर निकम यांची माहिती हवी आहे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **फक्त जात वैधता प्रमाणपत्राची (प्रत) माहिती** (त्रयस्थपक्षाने जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेली वैयक्तिक तपशिलाबाबतची अनुषंगिक कागदपत्रे वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-२६७७----- दिनांक :-०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२५०८/२०२१

श्री.शंकर जयवंतराव संबुटवाड,
रा.तबेला गल्ली, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर
विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर
विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात दाखल प्रस्ताव व जात वैधता प्रमाणपत्र, अवैध प्रमाणपत्रासंबंधी सन २०१६ ते ऑगस्ट २०२१ पर्यंत माहिती मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२९.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, आज रोजी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाची जवळजवळ १० व्दितीय अपिले सुनावणीसाठी प्रस्तावित असुन विचाराधिन व्दितीय अपिलातील माहिती व प्रथम अपिलाचा कोणताही बोध कार्यालयातील अभिलेखावरुन होत नाही. त्यामुळे या संदर्भात कोणतेही भाष्य करता येत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली फक्त संख्यात्मक

माहिती (वर्षनिहाय दाखल वैधता प्रमाणपत्र प्रस्तावाची संख्या / वैधता प्रमाणपत्र दिलेल्या उमेदवाराची वर्षनिहाय संख्या / जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या धारकांची वर्षनिहाय संख्या) माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2615 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर, प्लॉट नं.१०, सेक्टर ई-१, सेंट लॉरेन्स हायस्कुल जवळ, सिडको, बसस्टँड समोर, टाऊन सेंटर, सिडको, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२५०९/२०२१

श्री.शंकर जयवंतराव संबुटवाड, — अपिलार्थी
रा.तबेला गल्ली, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रबंधक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २०१६ ते ऑगस्ट २०२१, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती छत्रपती संभाजीनगर यांनी नांदेड जिल्ह्यात केलेल्या दौरा संबंधित माहिती मिळणेबाबत, एकूण केलेल्या दौऱ्याचा तपशिल, दौरा केलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे नाव, पद, दौरा रजिस्टरची सत्यप्रत, लॉगबुकची सत्यप्रतीसह, दौऱ्यात वापरण्यात आलेल्या वाहनाचा तपशिल, खर्चाचा वर्षनिहाय तपशिलाची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध अभिलेख अवलोकन करण्याकरिता संधी देण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.२९.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद कायम ठेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेल आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर

विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २८१५ दिनांक : ०५/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१५३९/२०२१**

कु.सोनम पि.विक्रम भालेराव,
रा.एन-११, के-४७/६, नवजीवन कॉलनी, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
विभाग प्रमुख,
मालमत्त विभाग, शहर औद्योगिक विकास महामंडळ, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
शहर औद्योगिक विकास महामंडळ, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.११.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, एन-११, के-४७/६, नवजीवन कॉलनी, हडको, छत्रपती संभाजीनगर या घराविषयी १९८५ ते २०२०, १) १९८५ ला एन-११, के-४७/६ हे घर कोणाच्या नावावर होते, २) त्यानंतर ते कोणाच्या नावावर झाले, कसे झाले, ३) सद्यस्थितीत कोणाच्या नावावर आहे, ४) याबाबत संपूर्ण तपशिल कागदपत्रासह, ५) हस्तांतरणाचा संपूर्ण तपशिल, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात संबंधित मालमत्ता ही अर्जदार (अपिलार्थी) यांच्यावर नसल्यामुळे व कलम ११ या नियमाखाली त्रयस्थ व्यक्ती असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळवून अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज निकाली काढलेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२२.१२.२०२० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, त्रयस्थपक्षाची माहिती विचारली असल्यामुळे माहिती नाकारण्यात येत आहे, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाची माहिती मागितली असल्यामुळे ती नाकारण्यात येऊन तसे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सदरील मालमत्ता ही अर्जदार यांच्या वडीलांच्या नावे असुन ते मयत झाल्यानंतर मा.दिवाणी न्यायालयाकडुन सदर मालमत्ता ही अर्जदार यांची बहीण माधुरी विक्रम भालेराव यांच्या नावावर करण्यात आलेली आहे, अर्जदार त्रयस्थ नसुन कायदेशीर वारस आहे, तरी सुध्दा माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे

मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख हा कायदेशीर प्रक्रियेतुन निर्माण झालेला सार्वजनिक अभिलेख आहे. असा अभिलेख प्रकट केल्यामुळे त्रयस्थपक्षाच्या खाजगी बाबीमध्ये कोणताही आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारताना ती नाकारण्याचे सबळ कारण अपिलार्थी यांना कळविलेले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, मालमत्ता विभाग, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. प्रशासन, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2613 दिनांक : 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -६९८२/२०२१

श्री.नरेंद्रमोहन हरचरणदास मल्होत्रा,
रा.प्लॉट क्र.१७६, समर्थनगर, चंद्रमिरा सदन अपार्टमेंटच्या समोर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
भुमुल्यांकन अधिकारी,
सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ११.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, गट क्रमांक १७४ (भाग) प्रितीनगर, तिसगाव, वाळूज महानगर-१, ता.जि.छत्रपती संभाजीनगर मधील तीन एकर २० गुंठे जागेमधुन सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी संपादित केलेल्या जमिनीची माहिती मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देऊन नकाशाच्या प्रमाणित प्रती उपअधीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेण्याचे व निवाड्यासंदर्भात अधिक माहितीकरिता विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क करण्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.०६.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. तसेच जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही त्या माहितीकरिता उपअधीक्षक भूमि अभिलेख, विशेष भूसंपादन अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क करण्याचे अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती देण्यात आली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा भूमुल्यांकन अधिकारी, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी

माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सांयं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. प्रशासन, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६१२ दिनांक : ०५/०३/२०२४

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७१८५/२०२१

श्री.शेख रशीद शेख इमाम,
रा.गांधेली, पो.आडगाव (बु), ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपनियोजनकार,
नियोजन विभाग, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
१.२ जन माहिती अधिकारी तथा
सहा कार्य अभियंता,
अतिक्रमण विभाग, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्रशासक,
सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट अॅपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २५.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. दि.३१.०३.२०२१ रोजी दिलेल्या अर्जावर आपण कोणती कार्यवाही केली त्याची सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, २. गट क्रमांक १७६ मध्ये शेख अब्बास शेख नजमोद्दीन यांनी आपल्या कार्यालयामार्फत घेतलेल्या परवानगीची सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, ३. आपल्या कार्यालयात शेख अब्बास शेख नजमोद्दीन परवानगी घेण्यासाठी भरलेल्या पैशाची सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा नियोजन विभाग यांनी दि.१५.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र.३ ची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण विभाग यांनी त्यांच्या दि.१६.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती कलम ८ (छ) व कलम ८ (ज) नुसार देता येणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.२१.०६.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र दिले असल्याचे नमूद करुन सदर पत्राचे स्पष्टीकरण अपिलार्थीस परस्पर १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे दोनही जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कोणताही विकास प्रस्ताव मंजुरीस्तव सिडको कार्यालयाकडे प्राप्त झालेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध नसल्याचे वस्तुस्थितीसह कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपनियोजनकार, नियोजन विभाग व सहा कार्य अभियंता, अतिक्रमण विभाग, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना; अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. प्रशासन, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्रं.२६११ दिनांक :- 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२४४५/२०२१**

श्री.चंद्रकांत लक्ष्मीकांत शिरखेडकर,
रा.प्लॉट नं.३०, छत्रपती नगर, गजानन कॉलनी जवळ, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक पणन अधिकारी,
सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १३.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, प्लॉट नं.६ टीसी ई-१ सेक्टर सिडको टाऊन सेंटर छत्रपती संभाजीनगर या मालमत्ता बाबत पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद (शहर) यांनी त्यांचे पत्र जा.क्र.१५४२/२०२१, दि.१२.०३.२०२१ व स्मरणपत्र जा.क्र.३४१५/२०२१, दि.१२.०६.२०२१ या पत्रावरुन केलेल्या कार्यवाही, पत्रव्यवहार असल्यास त्याची प्रत मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीच्या आवश्यक शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.३१.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहितीची मागणी केलेनुसार श्री.सुधिर लक्ष्मीकांत शिरखेडकर यांचेवर गुन्हा दाखल झालेला असल्यामुळे व सदरील गुन्ह्याचा तपास एन-७ पोलीस स्टेशन येथे चालु असल्याने व प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मागणी केलेली माहिती सद्यस्थितीत देता येणार नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१८.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, पोलीस स्टेशनला दिलेले पत्र अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापपर्यंत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे चौकशी

प्रकरणाबाबत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. चौकशी प्रक्रिया पूर्ण होऊन निर्णय अंतिम झालेला असल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देय होईल. अन्यथा अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणाची अद्ययावत सद्यस्थिती अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पणन अधिकारी, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. प्रशासन, सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2610 दिनांक : 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७७६६/२०२१

श्री.विश्वनाथ महादू काथार,
सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई शाखा छत्रपती संभाजीनगर, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई शाखा छत्रपती संभाजीनगर, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.कोल्हे यांना आरक्षित अधिक्षक पदावर दिलेल्या पदोन्नती आदेशाची प्रत, श्री.एफ.जी.तळेकर यांना दि.३०.०६.१९९६ रोजी आरक्षित अधिक्षक पदावर दिलेल्या पदोन्नती आदेश व पदोन्नती समितीच्या इतिवृत्ताची प्रत या दोन मुद्यासह इतर ३९ मुद्यावर सन १९९९ ते सन २०२१ या कालावधीची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२४.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, उपलब्ध असलेल्या माहितीकरिता रु. १९६/- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणेबाबत व मुद्दा क्र.७, ११, १४ ते १६, २०, २१, २२, २४ ते २६, २७ या संदर्भातील माहितीचा कार्यालयीन अभिलेखामध्ये कसोशीने शोध घेऊन ती आढळुन येत नसल्याने ती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२२.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०४.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन, मुद्दा क्र.२० ची माहिती मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद या कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२४.०५.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२४.०५.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे, जी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकत नाही त्या माहितीकरिता आस्थापना अधिकारी, सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे मुद्दा क्र.७, ११, १४, १५, १६, २१, २६ व ३७ च्या माहितीची मागणी केली असल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्या दि.०३.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र.१५ च्या संदर्भातील आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देऊन उर्वरित माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०३.०६.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना मुद्दा क्र.१५ च्या संदर्भातील आदेशाची प्रत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सन १९९९ ते सन २०२१ या कालावधीतील असुन ती ४१ मुद्यांव्दारे मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्या त्या टप्प्यावर उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना विहित कालावधीत देण्यात आलेली आहे. तसेच जी माहिती अपिलार्थीस देता येत नाही त्या बाबत वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे व भूमिकेचे समर्थन करुन मुद्दा क्र.१५ च्या संदर्भातील माहिती संबंधित कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१५ च्या संदर्भातील माहिती संबंधित कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अधीक्षक पदाचा मानिव दिनांक मिळण्याबाबत व आस्थापना अधिकारी पदावर पदोन्नती मिळणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे प्रकरण दाखल करावयाचे असल्याने आढळुन न आलेली माहिती तथा उपलब्ध करुन न दिलेली माहिती प्रकरण दाखल करणे कामी आवश्यक, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई शाखा छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उप सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई शाखा छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2609 दिनांक :- 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०५५१/२०२३

श्री.सुनिल सखाराम साबळे,
रा.काझीवाडा, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ सरव्यवस्थापक,
छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ कार्यकारी संचालक,
छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी दि.०६.०१.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. व्यवस्थापक व कार्यकारी संचालक अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"सन २००५ ते २००६ मध्ये औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. छत्रपती संभाजीनगर या बँकेत नोकर भरती करण्यात आली, यासाठी बँकेने वर्तमान पत्रात जाहिरात दिली असल्यास त्याची प्रत, मे.जिल्हा सेवा नियोजन अधिकारी या कार्यालयाला उमेदवार यादी पाठविलेल्या पत्राची प्रत, त्यांच्याकडुन उमेदवारांची आलेली यादी, बँकेच्या निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांचे पदनिहाय यादी, मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांचे दिलेली जात प्रमाणपत्राच्या प्रती, तसेच निवड समितीने उमेदवारांच्या निवड केलेल्या समितीचा अहवाल, सध्या बँकेत कर्मचाऱ्यांची २००० पूर्वीची यादी, अनुक्रमांक, नाव, नेमणूक दिनांक, पद, अनुसुचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती यांच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात"

सदर माहिती अर्जासंदर्भात सरव्यवस्थापक यांनी त्यांच्या दि.१२.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी सहकारी संस्थेस लागू नसल्यामुळे मागणी केलेली माहिती देणे बंधनकारक नसल्याचे अपिलार्थी यांना कळवून अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज निकाली काढलेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१९.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भात कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी सहकारी संस्थेस लागू नसल्यामुळे मागणी केलेली माहिती देणे बंधनकारक नाही, त्यामुळे अपिलीय अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सहकारी बँकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नसल्याची भूमिका घेऊन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच माहिती अर्जासंदर्भात दाखल केलेले प्रथम अपील सुनावणी न घेताच निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जरी नोंदणीकृत सहकारी संस्थांना माहिती अधिकार कायदा लागू होत नसला तरी अशा सर्व सहकारी संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा (MCS Act) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ यातील नियम ६५ अन्वये प्रत्येक वर्षी संस्थेच्या संदर्भातील माहिती संबंधित निबंधक कार्यालयात दाखल करणे हे बंधनकारक आहे. तसेच नियम ७९ (२) यात निबंधक कार्यालय यांना कलम ७९ (१) आणि १ (A) यात दाखल करावयाची माहिती सादर न केल्यास सक्त निर्देश देण्याचे अधिकार सुध्दा नमूद केले आहेत. नियम ६५ अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने लेखापुस्तक व सहकारी कायद्या अंतर्गत बंधनकारक असलेली सहकारी संस्थेने केलेले वार्षिक गतीविधी संबंधित माहिती देणे आवश्यक आहे. वरील माहिती ही निबंधक कार्यालयात प्रतिवर्षी दाखल करणे सहकारी संस्थांना कायद्याने बंधनकारक असल्याचे मा.उच्च न्यायालय यांनी त्यांच्या निर्णयात सर्व निबंधक, उपनिबंधक, सह निबंधक कार्यालयास वेळोवेळी निर्देशित केलेले आहे. त्यांच्या

कार्यक्षेत्रात नोंदणीकृत सहकारी संस्थांनी दाखल केलेल्या अशा माहितीतुन अर्जदार यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध असल्यास माहिती प्रदान करावी व ही जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. तसेच कलम १९ (क) नुसार संस्थांनी निबंधक कार्यालयास सादर करावयाची माहिती दाखल केली नसल्यास अशी माहिती संबंधित संस्थेकडुन प्राप्त करुन घेऊन ती अर्जदार यांना पुरविणे देखील नियमाने बंधनकारक केलेले आहे. मात्र यातील त्रयस्थपक्षाशी संबंधित अथवा कोणाच्या खाजगीपणाचे हक्कावर गदा आणणारी माहिती देणे कलम ८ (१) नुसार बंधनकारक नाही. अशी माहिती देण्यास संबंधित निबंधक कार्यालय नकार देऊ शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता, संबंधित छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर यांनी निबंधक कार्यालयात सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागितलेली माहिती ही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या अभिलेखात असल्यास अशी माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस १५ दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २६१६ दिनांक :- ०५।०३।२०२५

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१०५५२/२०२१

श्री.सुनिल सखाराम साबळे,
रा.काझीवाडा, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालय, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक,
विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालय, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २४.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, "सन २००५ ते २००६ मध्ये औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. छत्रपती संभाजीनगर या बँकेत नोकर भरती करण्यात आली, यासाठी बँकेने वर्तमान पत्रात जाहिरात दिली असल्यास त्याची प्रत, मे.जिल्हा सेवा नियोजन अधिकारी या कार्यालयाला उमेदवार यादी पाठविलेल्या पत्राची प्रत, त्यांच्याकडुन उमेदवारांची आलेली यादी, बँकेच्या निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांचे पदनिहाय यादी, मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांचे दिलेली जात प्रमाणपत्राच्या प्रती, तसेच निवड समितीने उमेदवारांच्या निवड केलेल्या समितीचा अहवाल, सध्या बँकेत कर्मचाऱ्यांची २००० पूर्वीची यादी, अनुक्रमांक, नाव, नेमणूक दिनांक, पद, अनुसुचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती यांच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात" अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.२७.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचा प्रतिसाद विचारात घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विनामूल्य माहिती

देण्याचे आदेशित करावे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २६१७ दिनांक : ०५/०३/२०२५

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -९३०७/२०२१

श्री.अंबादास राजाराम तळणकर, — अपिलार्थी
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण,
जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण,
जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २१.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ०१ एप्रिल २०१३ ते ३० जून २०२१, आपल्या विभागातील भांडार व डि.बी. शाखेमार्फत सि.सि.टि.व्ही. या साठीचे डि.व्ही.आर, हार्डीक्स, टी.व्ही., इंस्टॉलेशन तसेच झेरॉक्स मशीनचे निर्लेखन व खरेदी केलेल्या सर्व अभिलेखाची निर्लेखन अहवाल, यासाठीचा झालेला संपूर्ण पत्रव्यवहार व खरेदीसाठी कार्यालयीन टिपणी, कोटेशन नोटीस प्राप्त दरपत्रक, पुरवठा आदेश यासाठीचे देयक, सदर सामुग्रीची नमुना ३५, ३७ व इतर नमुन्यामध्ये घेतलेली नोंद, सदर देय नोंदवलेली मोजमाप पुस्तिका, सदर देयकाची निधी मागणी सहप्रस्ताव व निधी मंजुरीचे सविस्त आदेशाची माहिती छायांकित प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडून कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२९.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान माहिती मिळाली नसल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. अधीक्षक अभियंता, जायकवाडी पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६८५ दिनांक : २८/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, जायकवाडी पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -९३०८/२०२१

श्री.अंबादास राजाराम तळणकर,
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ०१ एप्रिल २०१३ ते ३० जुन २०२१, आपल्या विभागातील भांडार व डि.बी. शाखेमार्फत सि.सि.टि.व्ही. या साठीचे डि.व्ही.आर, हार्डीक्स, टी.व्ही., इंस्टॉलेशन तसेच झेरॉक्स मशीनचे निर्लेखन व खरेदी केलेल्या सर्व अभिलेखाची निर्लेखन अहवाल, यासाठीचा झालेला संपूर्ण पत्रव्यवहार व खरेदीसाठी कार्यालयीन टिपणी, कोटेशन नोटीस प्राप्त दरपत्रक, पुरवठा आदेश यासाठीचे देयक, सदर सामुग्रीची नमुना ३५, ३७ व इतर नमुन्यामध्ये घेतलेली नोंद, सदर देय नोंदवलेली मोजमाप पुस्तिका, सदर देयकाची निधी मागणी सहप्रस्ताव व निधी मंजुरीचे सविस्त आदेशाची माहिती छायांकित प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२९.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान माहिती मिळाली नसल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती

संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. अधीक्षक अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६८३ दिनांक : ०८/०३/२०२५

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -४३७८/२०२१**

श्री.उत्कर्ष यशवंत दांडगे,
रा.फुलेनगर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २६.११.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, कार्यालयातील कामांबाबत सन २०१५ ते २०२०, १. विभागांतर्गत ठेकेदारांकडुन जे कामे करुन घेतली जातात त्यांची यादी, २. सदरील कामाच्या अटी, शर्ती, गाईडलाईनची (निविदा प्रक्रियांची) माहिती देण्यता यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, नेमक्या कोणत्या निविदेसंदर्भात माहिती हवी आहे त्याचा नेमका तपशिल अर्जात नमुद केलेला नाही तसेच मागणी केलेली माहिती मोघम असल्यामुळे ती पुरविता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.०८.१२.२०२० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मोघमपणे सन २०१५ ते २०२० या कालावधीतील ठेकेदाराकडुन करुन घेतलेल्या कामाबाबत तसेच निविदांबाबत माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या महिती अर्जात नेमक्या कामाचा, नेमक्या निविदाचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती मोघम असल्यामुळे माहिती पुरविता येत नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागणी केलेली माहिती मोघम असल्यामुळे ती पुरविता येत नाही असे उत्तर देऊन माहितीपासुन वंचित ठेवले, असे कारण नमूद केलेले आहे.

अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार हव्या असलेल्या माहितीचा नेमका संदर्भ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2685 दिनांक : 06/03/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१०८९९/२०२१

श्री.कदम गिरीश विठ्ठलराव,
रा.गणपती मंदिराजवळ, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २२.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ०१ मार्च २०१९ ते आजपर्यंत, १. केंद्र ६१९ कै.हरिबाई वरपुडकर कनिष्ठ महाविद्यालय, पेडगाव, ता.जि.परभणी येथे वरील कालावधीत दिनांक १३ मार्च २०१९ आपले कार्यालयाचे (मंडळाचे) वरिष्ठ अधीक्षक ए.बी.जाधव यांचे भेटी दरम्यान सदर केंद्र क्र.६१९ वर सामुहिक कॉपीचा प्रकार सुरु असल्याचे जाधव यांचे निदर्शनास आल्याने ते मंडळामार्फत सदर केंद्रावर कारवाई करण्यासाठी शिक्षणाधिकारी (मा) यांना ज्या नोटीस दिल्या नोटीसच्या छायांकित प्रती, २. सदर नोटीसवरुन वंदना वाव्हुळ यांनी कारवाई करुन जो अहवाल मंडळात दाखल केला त्याच्या छायांकित प्रती, ३. मुद्दा क्र.१ व २ नुसार अहवाल अजुनही दाखल केला नसेल तर वंदना वाव्हुळ यांचेवर मंडळाकडुन कारवाईचा दंडात्मक चौकशी अहवालाच्या छायांकित सत्यप्रती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, उपलब्ध माहिती १० पृष्ठांची असुन त्यासाठी रु.२०/- इतक्या रकमेचा धनाकर्ष / रोख रकमेव्दारे अदा करण्याचे अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१४.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.१०.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन शुल्क रु.२०/- इतक्या रकमेचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थी यांना सुचित करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास मुदतीत प्रतिसाद देऊन विहित शुल्काचा भरणा करणेबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अद्याप शुल्काचा भरणा केलेला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी

घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना सूचित करुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, रु.२०/- शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि शुल्काचा भरणा केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेला नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्याबाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी असा पुरावा उपलब्ध करुन दिल्यानंतर वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2686 दिनांक :- 06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -३२८१/२०२१

श्री.इरशाद मोहमद खान (माजी सैनिक), — अपिलार्थी
रा.घ.क्र.१-२४-५३, पी. रोहेला गल्ली, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली असुन प्राप्त माहितीबाबत आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2687 दिनांक : 06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९७०३, ९७०४ व ९७०५/२०२१ (०३)**

श्री.जगन्नाथ विनायक पवार,
रा.चापानेर, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., चापानेर, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०५.२०२१ रोजीच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, **माहिती अर्ज क्र.१** दि.११.०५.२०१५ मीटर जळालेचा अर्ज दिला मिटर न देता अंदाजे बिल भरले, मिटर शिल्लक नाही म्हणून शेवटेचे बिल दि.२८.०१.२०१६ ला ४००/- रु. भरले, पूर्ण बिल दि.२९.०३.२०१६ ला ७१६ युनिट नोंद कशा आधारे घेतली माहिती हवी / **माहिती अर्ज क्र.२** शाखा चापानेर ऑफिसला ड्युटी असताना तेथे न राहता छत्रपती संभाजीनगरला जाणे येणे करतात, ते कोणत्या अधिकाऱ्याच्या परवानगीने, त्या अधिकाऱ्याचे नाव, आदेशाची प्रत मिळावी / **माहिती अर्ज क्र.३** दि.१७.०३.२०२१ ला चापानेर ग्रामपंचायत रात्री ९ ते १० दरम्यान विद्युत लाईटमुळे शॉट सर्किटमुळे ग्रामपंचायतीमधील जनतेचे १९५० पासुनचे पूर्ण कागदपत्र जळाले करिता विज वितरणचे किती बील बाकी असुन ग्रामपंचायत आपली लाईट चोरुन वापरत होती त्याबद्दल माहिती हवी आहे व इतर, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.०६.२०२१ रोजीच्या तीन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कार्यवाही केली नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., चापानेर, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या अपिलार्थी यांना,

नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी- यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., चापानेर, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २०८८ दिनांक : २६/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९८८/२०२१

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उप प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २२.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणेमध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वंयप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती www.bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, तसेच मागणी केलेली माहिती ही, मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित) नियम २००९ चे कलम १३ (ह) मध्ये मोडत असल्यामुळे माहिती अधिकारातंर्गत उपलब्ध करुन देता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१३.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०३.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थीस तसे संकेतस्थळ कळवून सदर संकेतस्थळावर संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सुचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना न्यायालयाकडुन कागदपत्र स्वरुपात माहिती हवी आहे. मात्र मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित) नियम २००९ मधील कलम १३ (ह) मध्ये असे नमूद केलेले आहे की, सार्वजनिकरित्या प्रकाशीत असलेली किंवा संकेतस्थळावर उपलब्ध कोणतीही माहिती उघड करता येणार नाही. सदर तरतुद विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली माहिती संकेतस्थळावरुनच घ्यावी लागेल. कारण कलम १३ (ह) मधील तरतुदीनुसार अभिलेख स्वरुपात अभिलेखात उपलब्ध माहिती न्यायालयाकडुन कागदपत्र स्वरुपात अपिलार्थी यांना देता येणार नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी

यांनी दिलेला प्रतिसाद व मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित) नियम २००९ मधील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी व मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित) नियम २००९ मधील तरतुदी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०३.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन दि.०४.०८.२०२१ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-2609- दिनांक :-06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९८९ व ७९९०/२०२१ (०२)

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्ले धारुर, ता.किल्ले धारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई ५१ — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०३.२०२१ रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, माहिती अर्ज क्र.१ महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात शासकीय / निम्नशासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध २००५ मधील कलम ८ नुसार नागरिकांची सनद प्रसिध्द करणे सर्व कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे, तसेच याबाबतचे नियमसुध्दा तयार करण्यात आलेले आहेत व कृतीच्या मानांकनाची पुर्तता न झाल्यास नागरिकास देय नुकसान भरपाई याची माहिती साक्षांकित करुन मिळणेबाबत / **माहिती अर्ज क्र.२** केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आबंधणे मध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वयंप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी सदरील माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर दोनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीच्या रु.५१/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसून येत नाही. त्याऐवजी अपिलार्थी यांनी, माहिती अर्जाची माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद करुन दि.१२.०४.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दोन प्रथम अपील दाखल केलेले आहेत. सदर प्रथम अपिलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.०५.२०२१ रोजी सुनावणी असल्याबाबत दि.२१.०५.२०२१ रोजी सुनावणीची नोटीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना निर्गमित केली असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी माहितीपोटीच्या विहित शुल्काचा भरणा केलेला नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी सुचित

केल्याप्रमाणे विहित शुल्काचा भरणा करावा. अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केल्यानंतर पुढील पंधरा दिवसात वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

२. भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व), मुंबई ५१ यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २६७४ दिनांक : ०६/०३/२०२४

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९९१/२०२१

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
अपर कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, लेखा व कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, लेखा व कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणेमध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वयंप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.१६.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.०३.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ अपिलार्थीस कळवून सदर संकेतस्थळावर माहिती उपलब्ध असल्याचे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसे अपिलार्थी यांना अधिकृत संकेतस्थळ कळवून संकेतस्थळावर माहिती उपलब्ध असल्याचे अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी www.mahakosh.maharashtra.gov.in>RTI या संकेतस्थळावर संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असुन तसे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना संकेतस्थळासह कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचा असा प्रतिसाद विचारात घेऊन, माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्यामुळे ती लेखी स्वरुपात देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, सन २०११ वेबसाईटवर माहिती, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, लेखा व कोषागार कार्यालय, छत्रपती

संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे साक्षांकित करुन अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, लेखा व कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १६७३ दिनांक : ०८/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९९२/२०२१

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
दक्षता व गुणनियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक संशोधन अधिकारी,
दक्षता व गुणनियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०४.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणेमध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वंयप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.२७.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०६.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०४.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन माहिती घेणेबाबत अपिलार्थी यांना कळविले असल्याचे नमूद करुन कार्यालयाल उपलब्ध असलेली माहिती निशुल्क उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहितीच्या नावाखाली निरर्थक दुसरीच इंग्रजीत माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे साक्षांकित करुन अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध

नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक संशोधन अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2671 दिनांक : 06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -७९९३/२०२१**

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके, अपिलार्थी
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
निबंधक,
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर (उत्तर), पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
संचालक,
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर),
पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०४.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणेमध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वंयप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.२७.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती नियमान्वये योग्य व समाधानकारक असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व अस्पष्ट माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा निबंधक, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन

द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. संचालक, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2672 दिनांक : 06/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७९९४/२०२१

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके, — अपिलार्थी
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
स्वीय सहायक,
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, उच्च न्यायालयाची जुनी ईमारत, दुसरा मजला, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप प्रबंधक,
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, उच्च न्यायालयाची जुनी इमारत, दुसरा मजला, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाइन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (१) (क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणेमध्ये नमूद कार्यालयाची माहिती स्वंयप्रेरणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तरी कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.१६.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०५.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, अपिलार्थी यांनी माहिती अधिकारातंर्गत दाखल केलेल्या अर्जात मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असुन अपिलार्थी यांनी ती प्राप्त झाल्याची पावती / पुष्टी पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेले असल्यामुळे अपिलार्थी यांच्या अपिलात कोणतेही तथ्य दिसुन येत नाही, असे नमूद करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३०

दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उप प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २६७० दिनांक : ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२७१५/२०२१

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर, ता.किल्लेधारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर, जबिंदा एव्हेन्यू, जिल्हा व सत्र न्यायालयासमोर, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधिश,
महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर, जबिंदा एव्हेन्यू, जिल्हा व सत्र न्यायालयासमोर, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २९.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात शासकीय / निम्नशासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध २००५ मधील कलम ८ नुसार नागरिकांची सन प्रसिध्द करणे सर्व कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे, तसेच याबाबतचे नियमसुध्दा तयार करण्यात आलेले आहेत, व कृतीच्या मानांकनाची पुर्तता न झाल्यास नागरिकास देय नुकसान भरपाई याची माहिती साक्षांकित करुन मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.०७.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे, कोणत्याही नागरिकास नुकसान भरपाई अदा केली नसल्यामुळे माहिती निरंक आहे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील खारीज केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली

नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती निरंक असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविले आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.२०७१ दिनांक : ०६/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -३६७३/२०२१

श्री.जफर खान गफ्फार खान,
रा.संजयनगर, बायजीपुरा, गल्ली नं.ए-११, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.०१.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपणामार्फत वर्क ऑर्डर सिद्दीकी मोहम्मद लईक अहेमद (सीआरसी २०५१४३१५-२७ इंटेंडर क्र.बी-१/२९, दि.२७.१०.२०२०) यांना देण्यात आलेली आहे. त्यांनी आपल्या कार्यालयात या बाबत त्यांचे इन्शुरंन्स पॉलिसी, लेबर लायसन्स, लेबर यादी व बार चार्ट जे जमा केले आहे त्याची साक्षांकित प्रत देण्यात यावी, तसेच त्यांनी जे काही कागदपत्रे आपल्या कायालयात सादर केलेले आहे त्याची छायांकित प्रत देण्यात याव्यात, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.११.०१.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कलम ५ (४) नुसार सहायक जन माहिती अधिकारी तथा निविदा लिपिक यांचे सहाय्य घेतले असल्याचे दिसून येत आहे. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०९.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, ४८ पृष्ठांची माहिती उपलब्ध असुन ती कार्यालयात व्यक्तिश: येऊन घेऊन जावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.०५.०२.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन उपलब्ध माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे सहायक जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे

मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या निविदा संकलनाशी संबंधित असल्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा निविदा लिपिक यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेण्यात आलेले आहे. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे संकलनातील ४८ पृष्ठांची माहिती सादर केल्यानंतर सदर माहिती कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहुन प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. कारण अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि असे नमूद करुन अपिलार्थी माहिती व्यक्तिश: घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित झालेले नाहीत. म्हणून माहिती अपिलार्थी यांना देता आलेली नाही. अपिलार्थी यांना माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता कार्यालयात उपलब्ध आहे. ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-२६६२ दिनांक :- ०५/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -५४८३/२०२१

श्री.सत्संगराज भिवराज सोनवणे, : अपिलार्थी
रा.नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिससमोर, नारळी बाग, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक,
राष्ट्रीय महामार्ग मंडळ, बांधकाम भवन, स्नेह नगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
शाखा अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग मंडळ, बांधकाम भवन, स्नेह नगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १७.११.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. सोबत जोडलेल्या निवदन अर्जावर आपल्या विभागाकडुन केलेल्या सर्व पत्रव्यवहार, ई-मेल, टिपणी, फाईल नोटींगच्या प्रती देण्यात याव्यात, २. सदरील अर्ज ज्या ज्या अधिकाऱ्याकडे होता त्यांचे संपूर्ण नावे, पदनाम, कार्यालयीन पत्ते, संपर्क देण्यात यावे, ३. सदरील अर्जावर अंतिम निर्णय झाले असेल तर त्याची प्रत देण्यात यावी, ४. सदरील अर्ज ज्या ज्या अधिकाऱ्यांकडे होता तो किती दिवस त्यांचेकडे होता याची माहिती देणे, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२२.१२.२०२० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, बांधकाम भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह

(माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, बांधकाम भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. शाखा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, बांधकाम भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. सहायक अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. सहायक अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.: २६०७३ दिनांक : ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
सहायक अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -६४५२/२०२१

श्री.सत्संगराज भिवराज सोनवणे,
रा.नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिससमोर, नारळी बाग, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपिक,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०३, छत्रपती संभाजीनगर,
बांधकाम भवन, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०३, छत्रपती संभाजीनगर,
बांधकाम भवन, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले, त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. महानुभव आश्रम ते केंब्रीज विद्यालय या बीड बायपास रोडच्या अंतर्गत एप्रिल २०२० ते आजअखेर केलेल्या किरकोळ दुरुस्ती, खड्डे बजुविणे अथवा अन्य बाबीवर केलेल्या खर्चाची वर्क ऑर्डर, बील कॉपी अन्य खर्च प्रत देण्यात यावे, २. वरील अंतराचे चालु असलेल्या रुंदीकरण, मजबुतीकरण कामाची खर्चाची, आर्थिक मंजूरीची प्रत देण्यात यावी, ३. वरील रुंदीकरण कामाची ॲग्रीमेंट प्रत (ठेकेदारासोबतची) देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देऊन मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती सद्भाव प्रा.लि. अहमदाबाद यांच्याशी संबंधित असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०५.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. तथापि प्रथम अपील निकाली काढताना त्यामध्ये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, जन माहिती अधिकारी यांचा प्रतिसाद, माहिती दिली किंवा नाही, माहिती देणेबाबत आदेशित करणे इ. याचा कोणताही ऊहापोह न करता प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती जाणून बुजून अपूर्ण, दिशाभूल करणारी व स्वहाताने तयार करुन दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०३, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उलपब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती

उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अभियंता, जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०३, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६७१ दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, बांधकाम भवन, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -७६९६/२०२१**

श्री.सत्संगराज भिवराज सोनवणे,
रा.नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिससमोर, नारळी बाग, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता.सोयगाव,
जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता.सोयगाव,
जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०३.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. आपल्या कार्यक्षेत्राखालील सर्व अनिवासी इमारती देखभाल दुरुस्ती मेन्टनन्स इ. कामाच्या सन २०१८ ते मार्च २०१९, एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखरेच्या वर्क ऑर्डरच्या प्रती देण्यात याव्यात, २. आपल्या कार्यक्षेत्राखालील सर्व निवासी इमारती देखभाल दुरुस्ती मेन्टनन्स इ. कामाच्या सन २०१८ ते मार्च २०१९, एप्रिल २०१९ ते मार्च २०२० अखरेच्या वर्क ऑर्डरच्या प्रती देण्यात याव्यात, ३. वरील सर्व वर्क ऑर्डरनुसार झालेल्या कामाच्या एम.बी. च्या प्रमाणित प्रती देणेत यावी, ४. वरील नोंदी एम.बी.त घेणाऱ्या व पेमेंटसाठी शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्याची पदासह नावे देण्यात यावीत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने दि.०२.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१३.०५.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पूर्ण माहिती न देता अपूर्ण माहिती दिली, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची पाठराखण करुन आदेश पारित केला आहे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांचे असे प्रयोजन विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उलपब्ध करुन द्यावी.

अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-2659- दिनांक :-25/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -६१६७/२०२१**

श्री.इरशाद मोहमद खान (माजी सैनिक),
रा.घ.क्र.१-२४-५३, पी. रोहेला गल्ली, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली असुन प्राप्त माहितीबाबत आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2658 दिनांक : 05/02/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -५८५७/२०२१

सौ.शबाना रहिम मन्सुरी,
रा.वॉर्ड नं.२, माऊली किराणाजवळ, अहिल्यादेवी नगर, श्रीरामपूर,
ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०३.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २०१९-२०२०, मजुर संस्थामार्फत केलेल्या व चालू असलेल्या सिमेंट क्रॉक्रीटचे रस्ते, चेकर्स (गट्टु) यांचे वर्कऑर्डर, कामाचे फोटो, सिमेंट, वाळू, डबर, डस्टचे शासकीय प्रयोग शाळेतील चाचणी निकर्षाची तपशिलवार माहिती मिळावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०६.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता / सहायक अभियंता / कनिष्ठ अभियंता यांचे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेतले असल्याचे व या पत्राची प्रत अपिलार्थीस पृष्ठांकित केली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.०४.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१०.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दि.१७.०५.२०२१ रोजी सुनावणी असल्याबाबत नोटीस निर्गमित केली असल्याचे दिसून येत आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणी निर्णयाचा संदर्भ नमूद करुन दि.३१.०५.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना ५७ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती संकलित / एकत्रित करुन ती अपिलार्थी यांना दि.३१.०५.२०२१ रोजीच्या पत्रासोबत नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.०५.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विविध सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन संकलित करुन अपिलार्थीस द्यावयाची असल्यामुळे ती संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती दिली नाही, प्रथम अपील आदेश मिळाले नाही, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि या निर्णयाची प्रत आयोगाच्या पटलावर सादर करण्यात आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६५६ दिनांक : ०५/०२/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -६४७४/२०२१**

श्री.कैलास पांडुरंग पवार,
रा.राधाकृष्ण रेसिडेन्सी, जी-१०, गट नं.७७, सातारा (खंडोबा), छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपिक,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ११.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, गंगापूर शहरातील शिवाजी चौकामधील तिन्ही बाजुच्या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाच्या (सिमेंटीकरण) इस्टीमेटची साक्षांकित झेरॉक्स, त्याचप्रमाणे रेती वापराविषयी शासनाचे आदेश याची साक्षांकित प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी

यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २८५७ दिनांक :- २५/०७/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७२१४/२०२१

श्री.अमिताभ रामलक्षण सिंग,
रा.प्लॉट नं.४८१, एन-१, सेक्टर एफ, सिडको, छत्रपती संभाजीनगर ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०१.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, 1. Certified copy of action taken on the direction given by the then additional Secretary shri Bhobhate vide letter dated 30.05.2013 addressing to chief engineer for registering an offence against engineers and staff related to misappropriation of huge amount of funds, २. Certified copy of action taken on the Complaints made by me vide letter dated -17.08.2020, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.०६.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का

उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुनं त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.२६५५ दिनांक :- ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -७२२८/२०२१

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार, — अपिलार्थी
रा.हीना मंजील, नुर कॉलनी, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., शिबीर कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., शिबीर कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, छत्रपती संभाजीनगर शहरात आपल्या कार्यालयातंर्गत एकूण किती उड्डानपुल बनवण्यात आले, सर्व ठेकेदाराबरोबर झालेले करारनामेची झेरॉक्स व कोणकोणते उड्डानपुल हस्तांतरण करण्यात आले सर्व आदेशाची झेरॉक्स तसेच नवीन बनवण्यात आलेली रोड व उड्डानपुल यांचे ऑडिट किती वर्षात केले पाहिजे शासन निर्णयाची झेरॉक्स प्रत, कोणकोणत्या उड्डानपुलाचे ऑडिट झाले सर्व माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.१६.०६.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०६.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०६.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद करुन, जी माहिती पुरविली नाही ती पुन:श्च शोध घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुरी माहिती मिळाली, माहिती उपलब्ध असुनही दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.०१.११.२०२३ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी, अपुरी माहिती मिळाली असल्याचे व पूर्ण माहिती मिळवून द्यावी, असे नमूद केलेले आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उलपब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती

उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २६५४ दिनांक : ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती
संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -८७३९, ८७४०, ८७४१/२०२१ (०३)**

श्री.मनिष भगवानदास अग्रवाल,
रा.ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज पेट्रोलपंपासमोर,
जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज पेट्रोलपंपासमोर,
जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ४६ | १६.०३.२०२१ | दि.०१.०१.२०१९ ते दि.१५.०३.२०२१, आपल्या विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या सर्व लेखन, साधन, सामग्रीची व पुरवठा केलेल्या (मागणी पत्र, कोटेशन नोटीस, प्राप्त दर पत्रके, तुलनात्मक पत्र, बाजार भाव, पुरवठा आदेश, पुरवठादार एजन्सीचे मंजुर देयक, पुरवठादार एजन्सीने केलेला पुरवठाचे प्रमाणक, पुरावा, वरिष्ठ / कनिष्ठ कार्यालयास पुरवठा केलेल्या व विहित नमुन्यात संबंधितांनी दिलेली पोहोच व इतर) अभिलेखांची तसेच इतर सामग्रीची पुरवठा व वितरण नोंदवहीची तसेच सदर लेखन, साधन, सामग्रीची शासकीय ग्रंथालय, मुद्रनालय व मध्यवर्ती कार्यालय, औरंगाबाद, नागपूर तसेच शासननियुक्त विविध संस्थाकडे मागणी केलेल्या पत्राची छायांकित प्रत |
| ४७ | १५.०३.२०२१ | दि.०१.०१.२०२० ते दि.१५.०३.२०२१ पर्यंत सर्व कामाचे कार्यारंभ आदेशाची व वर्णनानुसार शासन विहित नमुन्यात प्रपत्रात माहिती मिळणे, अ.क्र., निविदा सुचना क्र., जा.क्र., कामाचे नाव, विक्रीचा कालावधी, निविदा मिळाल्याची तारीख, उघडण्याची तारीख, निविदा रक्कम व टक्केवारी, ठेकेदाराचे नाव, ठेकेदाराचा करारनामा क्रमांक व दिनांक |
| ४८ | १२.०४.२०२१ | दि.०१.०१.२०२० ते दि.३१.०३.२०२१ पर्यंत, विभागातील सर्व आवक, जावक, पत्रव्यवहार, कार्यारंभ आदेशाच्या आवक, जावक पुस्तकाची छायांकित प्रत विहित माहिती अधिकारात शिक्का व स्वाक्षरीत दिनांक नमूद करुन द्यावी. |

सदर तीनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१२.०५.२०२१ (०२) व दि.२५.०५.२०२१ (०१) रोजीच्या तीन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन पारित केलेल्या निर्णयाची प्रतदेखील प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विस्तृत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २६८२ दिनांक : ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९२३८/२०२१**

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार,
रा.हीना मंजील, नुर कॉलनी, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., शिबीर कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., शिबीर कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ३०.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयामार्फत टाऊन हॉल महानगरपालिका जवळ फ्लायओवर ब्रीज बांधण्यात आलेले आहे त्याचे वर्क ऑर्डर, एमबी, अँग्रीमेंट, पुल बांधकरिता किती रक्कम अदा करण्यात आली सहीत संपूर्ण संचिकेची झेरॉक्स प्रती द्यावी, तसेच सन २००५ पासुन कोणकोणत्या ठिकाणी नवीन रोड बनवण्यात आले त्याची लांबी रुंदी व दिलेल्या बिलासहीत फक्त यादी द्यावी, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.०२.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०२.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०७.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद करुन, जी माहिती पुरविली नाही ती पुनःश्च शोध घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुरी माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.०१.११.२०२३ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी, पूर्ण माहिती मिळवून द्यावी, असे नमूद केलेले आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उलपब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का

देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2583 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९२३९/२०२१**

श्री.सय्यद साबेर सय्यद सरदार,
रा.हीन मंजील, नूर कॉलनी, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १६.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, करोडी येथील नवीन कामाचे मान्यता प्राप्त डिजाईन व आवर भिंत तसेच दोन मजली इमारत बांधण्याचे आदेश व पत्र्याचे शेड बांधण्याचे आदेश, २०१७ मध्ये रु.२६.३२ लाख खर्च आला, ब्रेक टेस्टिंग ट्रॅक (बिटीटी) बांधण्यात आला त्याचे आदेशाची प्रत, वर्ष २०१८/२०१९ मध्ये अंदाजे ६० लाख रुपयाचे खर्च करुन पुन्हा ब्रेक टेस्टींग ट्रॅक बांधण्यात आले त्याचे आदेशाची प्रत तसेच पार्किंग, शौचालय, रस्ते आदी कामे करण्याचे आदेश सहीत पूर्ण संचिकेची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.०७.२०२२ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०६.०७.२०२२ रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन, आयोगाकडे अपील दाखल केल्यावर माहिती मिळाली, अशी पोच दिली असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे. सदर अर्जावर कार्यवाही करण्यास्तव सदरचे अर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे पाठविण्यात आले असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.०१.११.२०२३ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी, अपुरी माहिती मिळाली, मागणी केलेली पूर्ण माहिती मिळुन द्यावी, असे नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २५१६ दिनांक : २५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -८६३८/२०२१

श्री.बालासाहेब शंकर धबाले, — अपिलार्थी
रा.भारस्वाडा, ता.जि.परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रथम लिपिक,
मुख्य अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक मुख्य अभियंता (रस्ते),
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड या कार्यालयात कार्यरत असणारे श्री.अविनाश धोंडगे हे कार्यालयात रुजू होते वेळेस यांनी दिलेल्या कागदपत्रे (जात प्रमाणपत्र, टी.सी., रहिवासी, जात वैधता प्रमाणपत्र, कोणत्या आरक्षणाखाली) सर्व कागदपत्रे, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने अर्ज फेटाळण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.०२.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम ठेवलेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तसे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम ठेवलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये. माहिती देण्यात यावी, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे कळविण्याऐवजी माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कलम ६ (३) नुसार हस्तांतरित करणे आवश्यक होते. असे केल्याचे दिसून येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी मागणी केलेली व देय होणारी माहिती आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन संकलित / एकत्रित करुन द्यावी

लागेल. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ अधिकारी यांचेसंदर्भात माहितीची मागणी केलेली आहे.
सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, मुख्य अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्रयस्थ अधिकारी यांनी रुजू होताना सादर केलेल्या प्रमाणपत्राची केवळ यादी अशी माहिती ज्या कार्यालयात / प्राधिकरणात उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार संकलित / एकत्रित करुन अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२: सहायक मुख्य अभियंता (रस्ते), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २८९४ दिनांक : ०८/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -८६७८/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ११.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.येरेकर उपअभियंता यांच्या कार्यकाळात चालु असलेली कामाची यादी व झालेल्या कामाचे एमबी व सुरुवातीचे फोटो व नंतरचे फोटोची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे एखाद्या ठराविक माहितीची मागणी केल्यास देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व मोघम स्वरुपाची आहे. त्यामुळे नेमक्या माहितीची मागणी केल्यास देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३०

दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन, अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2589 दिनांक : 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -११५७२/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १६.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.अशोक येरेकर यांची पहिली पोस्टींग कोणत्या साली झाली याची माहिती, जॉईनिंगचे शहर व कोणत्या आधारे, शिक्षण, त्यावेळची जाहीर प्रगटनची माहिती, त्यांच्या कोणकोणत्या साली कुठे बदली झाली याची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देण्यात आलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2590 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -११५७६/२०२१

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.येरेकर उपअभियंता (दक्षिण) यांच्या कार्यकाळात निलंबित असल्याच्या कारणाची माहिती, वरील कार्यकाळात कोणत्या कामासाठी कोणत्या खात्याच्या लोकांनी प्रतिबंध चौकशी केली त्याची माहिती, सेवापुस्तिकात त्यांच्या निलंबनाची प्रतिबंधक पथकाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंद असल्यास त्या नोंदीच्या सेवापुस्तिकाची सत्यप्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१२.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देण्यात आलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थ अधिकारी यांचेसंदर्भात माहिती मागितलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात संबंधित त्रयस्थपक्षाच्या निलंबनाचा फक्त कालावधी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे

अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-2591------ दिनांक :-05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -११५७९/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले, त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयाच्या अंतर्गत कन्नड, गंगापूर, वैजापूर, खुलताबाद झालेल्या विकास कामांची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सहायक जन माहिती अधिकारी यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेतले असल्याचे दिसून येत आहे. यानंतर सहायक जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.०९.२०२१ / दि.३०.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे सदर माहिती दि.०६.१०.२०२१ रोजी अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. सहायक जन माहिती अधिकारी यांच्या पत्रास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.११.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, दि.१३.१०.२०२१ रोजी माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी, असे संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांना कळवून या पत्राची प्रत अपिलार्थी पृष्ठांकित केली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२२.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.१०.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील मंजूर केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयातील विविध सहायक जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेण्यात आलेले आहे. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादानुसार माहितीचे अवलोकन करण्याचे अपिलार्थीस सुचित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली

नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनावेळी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती अर्जानुसार हव्या असलेल्या माहितीचा नेमका संदर्भ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2592 दिनांक : 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२७५३/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपिक आस्था-१,
उपसंचालक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २८.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, श्री.प्रशांत कोळी उपअधीक्षक यांची नौकरीसाठी जोडलेले शैक्षणिक कागदपत्रांची व जातवैधता प्रमाणपत्र याची सत्यप्रतीची माहिती मिळावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.१०.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कलम ६ (३) नुसार कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचेकडे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित केला असल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी त्यांच्या दि.२२.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असुन ती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी दि.२१.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने ती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार देता येत नसल्याचे प्रथम अपील विनाकार्यवाही निकाली काढणे योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कलम

६ (३) नुसार त्यांचे कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर वर्ग केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी, मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे ती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी सुनावणी अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थ अधिकारी यांच्यासंदर्भात माहिती मागितलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (**त्रयस्थपक्षाने रुजू होताना सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रांची फक्त यादी तसेच त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती**), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यालय अधीक्षक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-२५९३ दिनांक :-२५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म.रा., पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक आस्था-१, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म.रा., पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२७५४/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक पोलीस स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २८.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयातंर्गत २०१८ ते आजपर्यंत समृध्दी महामार्गात गेलेल्या जमिनीचे वाद गावनिहाय ठिकाण गट नंबर नावनिहाय कोणत्या कोर्टात चालु आहे त्या कोर्टाचे नाव व केस नंबरची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत असुन कालावधी मोठा आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २५९५ दिनांक : ०५/०३/२०२५

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२७५७/२०२१**

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक, पोलीस स्टेशन समोर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १८.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयाअंतर्गत श्री.येळीकर (जेई) यांना दिलेला उपअभियंता (पीआर) चार्ज व सर्कल लाडसावंगी व सावंगी (जेबी) चार्ज मुख्यालय (टीएस) तांत्रिक शाखा यामध्ये सर्व केलेल्या कामाचे सत्यप्रतीची माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आस्थापना व पीबीआर शाखेशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.१०.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज आस्थापना-१ शाखा व पीबीआर १ व ३ शाखा, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे वर्ग केलेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, एका विषयाची माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे व उर्वरित विषयाशी स्वतंत्र अर्ज करण्याचे अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळाली नसल्यांमुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे आवश्यक असलेली माहिती

सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. २५६७ दिनांक : ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२५२७/२०२१

श्री.सुनिल ग्यानचंद अजमेरा,
रा.साधना अपार्टमेंट, राजाबाजार, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, मा.आ. अतुल सावे यांचे स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२०-२०२१ अंतर्गत केलेल्या वॉर्ड क्र.४७ मधील संस्थान गणपती समोरील रस्त्याचे कॉक्रीटीकरणबाबत दि.१३.०६.२०२१ ते आजपर्यंत उद्घाटन सोहळ्यापासुन आजपर्यंत, १. कामाची वर्क ऑर्डर, २. शेड्युल बी ची प्रत, ३. मनपाचे ना-हरकत प्रमाणपत्र, ४. कामाचे चालू करण्याअगोदरचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहितीचा अर्ज अपिलार्थी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तथापि माहिती सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि.२४.०८.२०२१ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज हस्तांतरित करण्यात आला असल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.०१.११.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. या नंतर जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सा.बां. दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.०५.०१.२०२२ रोजी २४ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन उपविभागीय अभियंता, सा.बां.दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या दि.१०.०१.२०२२ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सा.बां.दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांना प्रथम अपील निर्णयानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित केलेले आहे. मात्र या प्रमाणे अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये ज्या प्रमाणे मागणी केलेली आहे त्या प्रमाणे माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती दिली. परंतू अशी माहिती देताना सोबत अतिरिक्त २२ पृष्ठांची असंबंधित माहिती देऊन दिशाभूल केलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिलेला

आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांना कलम १९ (८) (क) (दोन) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.: १९७१ दिनांक : २३/०२/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२७५५/२०२१

श्री.रमेश रायबान गवळे,
रा.आयुष नेट कॅफे, क्रांती चौक पोलीस स्टेशनजवळ, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयातंर्गत चौका, सारोळा, घाटात चालु असलेले काम शासन मंजुरीची माहिती अंदाजपत्रकाची माहिती, वन विभाग खुलताबाद रेंज थांबवलेले कामे व जप्त केलेले पोकलँड कोणत्या आधारे जप्त केले, संबंधित रेंजरवर केलेली कारवाईची माहिती सन २०२० ते आजपर्यंत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१८.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी

यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2584 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२७५२/२०२१

श्री.मनिष भगवानदास अग्रवाल, — अपिलार्थी
रा.ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ३१.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या उपविभागातंर्गत असलेल्या खुलताबाद, गदाना, म्हैसमाळ या शासकीय विश्रामगृहात असलेल्या साधन, सामग्री, फर्निचर, हत्यारे व सनियंत्रण यांची नमुना ३५ च्या पुस्तकातील दरवर्षी घेतलेली नोंद व सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखाने तसेच आपल्या विभागीय कार्यालयाने पडताळणी केल्याचे अभिलेखांची छायांकित प्रत विहित माहिती अधिकारात शिक्का व स्वाक्षरीत दिनांक नमुद करुन घ्यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीपोटीच्या रु.७०/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०८.२०२१ रोजी २० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.३१.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याची बाब विचारात घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी शुल्क घेऊन माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा दि.३१.०५.२०२१ रोजीचा माहितीचा अर्ज प्रत्यक्षात कार्यालयाकडे दि.०९.०६.२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०९.०६.२०२१ रोजी प्राप्त झालेल्या माहिती अर्जास दि.०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीपोटच्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थीस सुचित केलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनाविलंब नोंदणीकृत डाकेने दि.२३.०८.२०२१ रोजीच्या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेली कार्यवाही

विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दि.२३.०८.२०२१ रोजीच्या पत्राने पोस्टाने पाठविलेली माहिती दिशाभुल करणारी असुन मुळ माहिती दडविण्यात आलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान शुल्क भरुन माहिती मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. २५८५ दिनांक : ०५/०३/२०२४

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२६१२/२०२१

श्री.ईस्माईल पटेल ईमाम पटेल,
रा.गल्ली नं.२०, न्यु बायजीपुरा, इंदिरानगर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रथम लिपिक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. श्री.मुरलीधर म्हस्के मुख्य लिपिक यांची नियुक्ती केल्याची आदेशाची प्रत, २. वरिष्ठ लिपिक वरुन मुख्य लिपिक पदाची पदोन्नतीचे आदेशाची प्रत, ३. अपंग प्रमाणपत्रावर नियुक्ती केल्यामुळे त्या प्रमाणपत्राची प्रत सर्व प्रती साक्षांकित करुन देण्यात यावे, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२२.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, ३० दिवसाची मुदत संपल्यानंतरही पत्र सुध्दा पाठविले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.३ व्दारे त्रयस्थपक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **मुद्दा क्र.१ व २ च्या** संदर्भातील माहिती तसेच **मुद्दा क्र.३ च्या** संदर्भात त्रयस्थपक्षाने अपंगाचे प्रमाणपत्र सादर केले किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी

केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2595 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२२४६/२०२१

श्री.निलेश गोरखनाथ धस,
रा.प्लॉट नं.५५, रेणुका नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २३.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, राजनगर, मुकुंदनगर, बंबाटनगर येथील आमदार निधीमधील चालु असलेले ड्रेनेज लाईन वर्क ऑर्डर इस्टीमेट, शेड्युल-बी, कामाचे ॲग्रीमेंट संचिका देण्यात यावे, ऑगस्ट २०२० ते आजपर्यंत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज अपिलार्थी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक, सा.बां. विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दक्षिण उपविभागाकडे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित केला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, अंदाजपत्रकाची माहिती सुनावणीदरम्यान उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे नमूद करुन कार्यारंभ आदेश व शेड्युल बी ची माहिती आठ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.१०.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, अंदाजपत्रकाची माहिती अपिलार्थीस देण्यात आली असुन उर्वरित माहिती आठ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सा.बां.दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित केलेले आहे. या नंतर जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, सा.बां. दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.१०.०१.२०२२ रोजीच्या पत्राचा संदर्भ नमूद करुन दि.२१.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती देऊ शकत नाही, असे उपविभागीय अभियंता, सा.बां.दक्षिण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांना कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2047 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२२९१/२०२१

श्री.साहेबराव रुपचंद चव्हाण,
रा.अंजनडोह, पो.नायगव्हाण, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत

नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), सहायक वनसंरक्षक (वन्यजीव) कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.५७५५/२०२१/एस/ 2653 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -६४४० ते ६४४५/२०२१ (०६)
बोर्ड क्र.७८ ते ८३

श्री.बबन विश्वनाथ सोनवणे, — अपिलार्थी
रा.फुलेनगर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव),
येडशी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वन्यजीव),
सहायक वनसंरक्षक (वन्यजीव) कार्यालय, पैठण स्थित, वन वसाहत,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा माळा, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे,
छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २३.१०.२०२० रोजीच्या सहा माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जातील माहितीचा तपशिल |
|---|---|
| ७८ | श्री.रहाणे वनपरिक्षेत्र अधिकारी हे रुजू झाल्यापासुन ते आजपर्यंत त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांनी वापरलेल्या शासकीय वाहनाकरिता करण्यात आलेल्या दुरुस्ती, ऑईल, डिझेल, पेट्रोलच्या प्रतिपुर्ती देयकाच्या तसेच सदर वाहनाचे मॅन्युलबुक, हिस्ट्रीबुकची छायांकित प्रत देण्यात यावी, |
| ७९ | श्री.रहाणे हे या कार्यालयात रुजु झाल्यापासुन त्यांनी कोणकोणते कामे केली, त्या कामाचा कार्यारंभ आदेश, कामाची मोजमाप पुस्तिका, मंजुर यादी, सादर केलेल्या देयकाच्या छायांकित प्रती, केलेल्या कामाचे फोटो इ. छायांकित प्रत देण्यात यावी, |
| ८० | श्री.रहाणे वनपरिक्षेत्र अधिकारी यांची सेवापुस्तिकेची प्रथम प्रत, शैक्षणिक, तांत्रिक शिक्षणाच्या छायांकित प्रत, दैनंदिन सेवा पुस्तिकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत देण्यात यावी, |
| ८१ | वनपरिक्षेत्र अधिकारी श्री रहाणे यांच्या विरोधात आपल्या कार्यालयात आतपर्यंत किती नागरिकांनी तक्रारी केल्या व आलेल्या तक्रारीवर काय कारवाई झाली, झालेल्या कारवाईच्या चौकशी अहवालाची माहिती तसेच तक्रारीची माहिती सत्यप्रतीमध्ये देण्यात यावी, |
| ८२ | आपल्या कार्यालयात एकूण किती कर्मचारी व वनपाल आहे त्याचे नाव, पद, रुजू झाल्याचे दिनांक याची सविस्तर माहिती देण्यात यावी, |
| ८३ | वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.रहाणे यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात वन्यजीव कायद्या अंतर्गत केलेल्या गुन्ह्याची माहिती, एकुण वन्यजीवामार्फत किती गुन्हेगारावर कार्यवाही झाली, किती प्रलंबित आहेत तसेच वन्यजीवाच्या संरक्षणार्थ विकास योजनाची पानवट्टे, वनतळे व वन्यजीव उपाय योजना अंतर्गत कामाची संपूर्ण माहिती वर्ष १९-२० ते आजपर्यंत, |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.३०.१२.२०२० रोजीच्या सहा प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, प्रथम अपिलाचा निर्णय प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती

प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.८० व ८१ मधील माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. तसेच बोर्ड क्र.७८, ७९, ८२ व ८३ मधील माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव यांनी बोर्ड क्र.७८, ७९, ८२ व ८३ मधील अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालय, येडशी. ता.जि.धाराशिव यांनी बोर्ड क्र. ८० मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित त्रयस्थपक्षाच्या शैक्षणिक व तांत्रिक प्रमाणपत्राची केवळ यादी तसेच बोर्ड क्र.८१ मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केवळ संख्यात्मक माहिती (प्राप्त तक्रारींची संख्या) अशी माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव), वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालय, येडशी, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

४. सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

५. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह सहा अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.६४४० ते ६४४५/२०२१/एस/-2605 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -८०९६/२०२१
बोर्ड क्र.८४

श्री.रवि देवराव बनकर,
रा.संसार नगर, क्रांती चौक पोलीस स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयाअंतर्गत झालेल्या कामांची योजनानिहाय, खर्चनिहाय, कार्यारंभ आदेश, कामाचे अगोदरचे फोटो व नंतरचे फोटो, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, कलम ७ (९) नुसार माहिती पुरविणे शक्य नसल्यामुळे दि.२०.०७.२०२१ रोजी माहितीचे अवलोकन करण्याकरिता हजर राहावे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.०३.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि मागणी केलेली माहिती मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, न्यायप्रकरणी, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान माहिती मिळाली नसल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही)

अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.८०९६/२०२१/एस/2675 दिनांक : 06/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -८५००/२०२१**
**बोर्ड क्र.८५**

श्री.रवि देवराव बनकर, — अपिलार्थी
रा.संसार नगर, क्रांती चौक पोलीस स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १८.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सॉ मिलची नावनिहाय, पत्त्यानिहाय यादी, अनुज्ञप्तीचा नमुना नोंदणी क्रमांक, माल आल्याचे रजिस्टर पुस्तक, उलाढालीचे पुस्तक, विल्हेवाट लावलेल्या लाकडाचा तपशिल, सर्व लाकुड कापणाऱ्या गिरणीसाठी लागणाऱ्या नोंद वह्या लाकडाची रचना, संरक्षण भिंत नसलेल्या सॉ मिलची नावे, तपासणी अधिकाऱ्यांनी जानेवारी २०१९ ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत तपासणी केलेला तपासणीचा अहवाल व तपासणी अधिकाऱ्यांच्या वाहनाचे लॉगबुकची माहिती, जानेवारी २०१९ ते ऑक्टोबर २०२० पर्यंत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१९.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करुनही माहिती मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान माहिती मिळाली नसल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा), सहायक वनसंरक्षक कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.८५००/२०२१/एस/ 2781 दिनांक :- 06/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -९५७४, ९५७६ ते ९५८३/२०२१ (०९)
बोर्ड क्र.८६ ते ९४

श्री.आर.एम.शेख, — अपिलार्थी
रा.एन-७, सी-६७, पोलीस कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा),
वनपरिक्षेत्र कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये नऊ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणातील नऊ माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली असुन प्राप्त माहितीबाबत आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन नऊ व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

नऊ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2636 दिनांक : 05/03/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -९५८४/२०२१
बोर्ड क्र.९५

श्री.आर.एम.शेख,
रा.एन-७, सी-६७, पोलीस कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक -१,
सामाजिक वनीकरण विभाग, वन वसाहत, नवीन प्रशासकीय इमारत,
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १०.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ०१ जानेवारी २०१८ ते आजपर्यंत, आपल्या कार्यालयामार्फत नवीन योजने अंतर्गत झालेल्या कामांची प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिका व बिलाच्या सत्यप्रती प्रमाणित करुन तात्काळ मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने देय होत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१२.०७.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध नसल्याची बाब अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या बाबीचे त्यांनी समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात माहिती उपलब्ध नसेल तर ती का उपलब्ध नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले नाही. सदर माहिती अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, वेळेत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान माहिती मिळाली नसल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.९५८४/२०२१/एस/2652 दिनांक :- 25/02/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, वनवसाहत, नवीन प्रशासकीय इमारत, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५२ व १५३/२०२१ (०२)
बोर्ड क्र.९६, ९७

श्री.आर.एम.शेख,
रा.एन-७, सी-६७, पोलीस कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना (दक्षिण) — : उत्तरवादी क्र.१
१.२ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना (उत्तर)

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, जालना, देवळगाव राजा रोड, कन्हैय्यानगर, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १६.१०.२०२० रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, **माहिती अर्ज क्र.१** (वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना दक्षिण) आपल्या कार्यालयास शासनास प्राप्त निधी व त्यानुसार झालेला खर्च याची तपशिलवार माहितीच्या प्रती साक्षांकित करुन तात्काळ मिळणेबाबत / **माहिती अर्ज क्र.२** (वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना उत्तर) आपल्या कार्यालयास शासनास प्राप्त निधी व त्यानुसार झालेला खर्च याची तपशिलवार माहितीच्या प्रती साक्षांकित करुन तात्काळ मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१९.११.२०२० रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०३.१२.२०२० रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १० दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना दक्षिण व जालना उत्तर यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (दक्षिण) व जालना (उत्तर) यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित वेळेत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना (दक्षिण) व

जालना (उत्तर) यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना (दक्षिण) व जालना (उत्तर) यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), सहायक वनसंरक्षक कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१५२,१५३/२०२१/एस/ 2637 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९३२१/२०२१**
**बोर्ड क्र.९८**

श्री.अंबादास राजाराम तळणकर,
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, कन्नड, नगर परिषद इमारतीच्या शेजारी, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली असुन प्राप्त माहितीबाबत आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.व्दि.अ.९३२१/२०२१/एस/**2629 **दिनांक :** 05/03/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९३२२/२०२१**
**बोर्ड क्र.९९**

श्री.अंबादास राजाराम तळणकर,
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, कन्नड, नगर परिषद इमारतीच्या शेजारी, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, आपल्या कार्यालयातील रोकडवही ची माहिती छायांकित प्रमाणित प्रतीत द्यावी अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडून कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.०३.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आज रोजीपर्यंत कुठल्याही प्रकारची पूर्ण माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत

नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (वन्यजीव व कॅम्पा), कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१३२२/२०२१/एस/ 2650 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९३२२/२०२१**
**बोर्ड क्र.१००**

श्री.सुनिल शिवाजी काकडे,
रा.सी-९/५, भरत नगर, एन-१३, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, अंजिठा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, राजे संभाजी चौक, जळगाव बायपास रोड, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ०१ एप्रिल २०२० ते मार्च २०२१, जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत केलेल्या खर्चाची कामनिहाय पत्तानिहाय सविस्तर माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०९.०६.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०७.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, अंजिठा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, अंजिठा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक), सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.८०८९/२०२१/एस/२६५/ दिनांक : ०५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -११८३२ व ११८३४/२०२१ (०२)**
**बोर्ड क्र.१०१ व १०२**

श्री.सुनिल शिवाजी काकडे,
रा.सी-९/५, भरत नगर, एन-१३, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, राजे संभाजी चौक, जळगाव बायपास रोड, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०७.२०२१ रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, **माहिती अर्ज क्र.१** आपल्या कार्यालयामार्फत जल व मृद जलसंधारणाची कामे करण्यात आली तसेच गुरे प्रतिबंध चर खोदण्यात आली, तसेच जिवंत रोपांचे कुंपण करण्यात आले या सर्व कामाच्या खर्चनिहाय कामनिहाय पत्तानिहाय सविस्तर माहिती / **माहिती अर्ज क्र.२** जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत केलेल्या खर्चाची कामनिहाय पत्तानिहाय सविस्तर माहिती, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.०८.२०२१ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनस्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छॅत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक, सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.११८३२ व ११८३४/२०२१/एस/ 2637 दिनांक :- 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९९१०/२०२१**
**बोर्ड क्र.१०३**

श्री.अंबादास राजाराम तळणकर,
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक-१,
३. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.व्दि.अ.८७४२ ते ८७४४/२०२१/एस/**2643 **दिनांक :** 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), नवीन वनभवन, वनवसाहत, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १२२५२ व १२२५४/२०२१ (०२)**
**बोर्ड क्र.१२९ व १३१**

श्री.गजानन फकिरराव मते,
रा.बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २३.०७.२०२१ रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, माहिती अर्ज क्र.१ सर्वे नं.६४ गट नं.२६७, क्षेत्र ६.८३ राखीव वनक्षेत्र, बिल्डा, ता.फुलंब्री या वनजमिनीवर अतिक्रमण झाले असल्याने याबाबत लगतचे खातेदार म्हणून दि.०८.०२.२०१८ रोजी तक्रार केली, याप्रमाणे कार्यालयाने संबंधित कार्यालयास केलेला पत्रव्यवहार, नेमण्यात आलेल्या चौकशी अधिकाऱ्याचे आदेश, चौकशी अहवाल, कारवाईची छायांकित प्रत / माहिती अर्ज क्र.२ सर्वे नं.६४ गट नं.२६७, क्षेत्र ६.८३ राखीव वनक्षेत्र, बिल्डा, ता.फुलंब्री या वनजमिनीवर अतिक्रमण झाले असल्याने याबाबत लगतचे खातेदार म्हणून दि.०८.०२.२०१८ रोजी तक्रार केली, याप्रमाणे कार्यालयाने संबंधित कार्यालयास केलेला पत्रव्यवहार, नेमण्यात आलेल्या चौकशी अधिकाऱ्याचे आदेश, चौकशी अहवाल, कारवाईची छायांकित प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१४.०९.२०२१ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती मिळाली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली

नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वनपरिक्षेत्र कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (प्रा), सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१२२५२ व १२२५४/२०२१/एस/२८५५ दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२२५३/२०२१**
**बोर्ड क्र.१३०**

श्री.गजानन फकिरराव मते,
रा.बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वनी),
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १५.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, सर्वे नं.६४ गट नं.२६७, क्षेत्र ६.८३, राखीव वनक्षेत्र, बिल्डा, ता.फुलंब्री या वनजमिनीवर अतिक्रमण झाले असल्याने याबाबत लगतचे खातेदार म्हणून दि.०८.०२.२०१८ रोजी तक्रारी केली, या प्रमाणे आपल्या कार्यालयाने संबंधित कार्यालयास केलेला पत्रव्यवहार, नेमण्यात आलेल्या चौकशी अधिकाऱ्याचे आदेश, याप्रमाणे संबंधित चौकशी अधिकाऱ्यानी दिलेला चौकशी अहवाल, सदर अहवालाप्रमाणे सदोष प्रकरणी केलेली कारवाईची छायांकित प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती माहिती अधिकाराचा शिक्का मुद्रीत करुन पान क्रमांक व दिनांक नमुद करुन द्यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, ११ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुनन प्राप्त झालेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. माहिती अर्जान्वये ज्या माहितीची मागणी केलेली माहिती ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस

निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक (वनी), उपवनसंरक्षक कार्यालय, वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.१२२५३/२०२१/एस/ 7641 दिनांक : 05/03/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १२७२४ व १२७२५/२०२१ (०२)**
**बोर्ड क्र.१३२ व १३३**

श्री.गजानन फकिरराव मते,
रा.बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय,
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (प्रा),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १७.०८.२०२१ रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, **माहिती अर्ज क्र.१** सर्व नं.६४ गट नं.२६७, क्षेत्र ६.८३ राखीव वनक्षेत्र बिल्डा, ता.फुलंब्री या वन जमिनीचे कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी, अर्जदार, गैरअर्जदार, लगतच्या चतु:सिमातील मालक व इतर सर्व पंचासमक्ष जायमोका पंचनाम्याची छायांकित प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती माहिती अधिकाराचा शिक्का मुद्रीत करुन पान क्रमांक व दिनांक नमुद करुन द्यावी / **माहिती अर्ज क्र.२** सर्व नं.६४ गट नं.२६७, क्षेत्र ६.८३ राखीव वनक्षेत्र बिल्डा, ता.फुलंब्री या वन जमिनीचे कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी, अर्जदार, गैरअर्जदार, लगतच्या चतु:सिमातील मालक व इतर सर्व पंचासमक्ष जायमोका पंचनाम्याची छायांकित प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती माहिती अधिकाराचा शिक्का मुद्रीत करुन पान क्रमांक व दिनांक नमुन करुन द्यावी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०७.१०.२०२१ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सहायक वनसंरक्षक (प्रा) कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी

अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सहायक वनसंरक्षक (प्रा) कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (प्रा), सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१२७२४, १२७२५/२०२१/एस/ 2606 दिनांक : 05/02/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२२९०/२०२१**
**बोर्ड क्र.१३४**

श्री.बबन पुना चव्हाण,
रा.अंजनडोह, पो.नायगव्हाण, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक)
वनपरिक्षेत्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वनी)
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २७.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २०१७, २०१८ ची यादी व २०२०, २०२१ पर्यंतची नवीन अतिक्रमण धारकाची यादी व नवीन यादी तयार करणेबाबत वरिष्ठांचे आदेशाचे प्रती, अंजनडोह व आडगाव (सरक) येथील अतिक्रमणधारक नावे वगळणेबाबतचे आदेश कॉपी छायांकित प्रतीसह माहिती मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०१.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, सुनावणी निर्णय अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी

चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (वनी), उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१२२९०/२०२१/एस/२६५६ दिनांक :- २५/०३/२०२४

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१२२९२/२०२१
बोर्ड क्र.१३५

श्री.साहेबराव श्रीरंग हजारे,
रा.प्लॉट नं.१२, संगिता कॉलनी, बास्केट बॉल ग्राऊंडच्या शेजारी, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सहायक वनसंरक्षक (प्रा) यांचे कार्यालय, उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (प्रा)
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ११.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २०१५ ते २०२० या कालावधीत औरंगाबाद वनवृत्तातील वनपाल यांनी वनक्षेत्रपाल पदावर झालेली पदोन्नती, वनक्षेत्रपाल यांनी सहायक वनसंरक्षक पदावर झालेली पदोन्नती, वरील दोन्ही पदांच्या (वनपाल, वनक्षेत्रपाल) वन कर्मचारी यांनी त्यांना मिळालेल्या पदोन्नत्या नाकारल्याबाबत माहिती, पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणीच्या दिवशी सुनावणी न घेता माहिती दिली (दि.१३.१२.२०२१), अपूर्ण माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सहायक वनसंरक्षक (प्रा) यांचे कार्यालय, वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत,

एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सहायक वनसंरक्षक (प्रा) यांचे कार्यालय, वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१२२९२/२०२१/एस/ २८०१५ दिनांक :- २५/०३/२०२५

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१०१७८/२०२१**
**बोर्ड क्र.१३६**

श्री.तुपे कल्याण रंगनाथ,
रा.शेंद्रा बन, पो.वरुड काझी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वनी),
उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०१.११.२०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे गंगापूर-शेंद्रा बन येथील वृक्ष तोडीबाबत तक्रारीबाबत माहिती, १. पंचनामा प्रत नक्कल, २. तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत, अशी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०६.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सहायक जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, गुन्हा शाखा यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेतले असल्याचे दिसून येत आहे. संबधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२६.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळणे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर

अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक (वनी), उपवनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.१०१७८/२०२१/एस/-2644 दिनांक : 05/03/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपवनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्र.४४०७, ४४०८, ५४११, ५४१२, ५४१५, ५४१७, ५४१८, ६८८७, ६८८८, ६८८९, ७०८२, ९२५५, ९२५६, ९२५८, ९२५९, ९२६०, ९२६५, १०२१५, १०२१६, १०२१७, ११८७३, ११८७४, ११८७५, ११८८० व ११८८१ (एकूण २५ व्दितीय अपिले)

| | | |
|---|---|---|
| बोर्ड क्र.१३७ ते १४३, १४६, १४९ ते १५२ व १५४ ते १६१ (एकूण २०) | श्री.रायभान किसन उघडे, रा.१४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| बोर्ड क्र.१४४, १४८ व १५३ (एकुण ०३) | श्रीमती मंगला रायभान उघडे, रा.१४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| बोर्ड क्र.१४५ व १४७ (एकुण ०२) | श्रीमती सुरेखा कृष्णा पवार, रा.१४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १३७ | ४४०७/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा मुलानी वडगाव, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १३८, १५२ | ४४०८/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १३९, १५९, १६० | ५४११/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त (विकास),<br>विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (विकास),<br>विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १४०, १४६, १४७, १४९, १५६ | ५४१२/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसिलदार (महसूल),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>तहसिलदार (महसूल),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १४१, १४५, १४८, १५०, १५१, १५४, १५५, १५७, १५८, १६१ | ५४१५/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १४२ | ५४१७/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,<br>सजा धनगाव, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १४३ व १४४ | ५४१८/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,<br>सजा शरणापूर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>अपर तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | | |
|---|---|---|---|
| १५३ | ९२६५/२०२१ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसिलदार,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण-फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. १ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण-फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. २ |

**(सुनावणी दिनांक ०१.११. २०२३)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 19 (3) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे 25 द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलांची सुनावणी गुगल मिट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आलेले आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी गुगल मिट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने अपिलार्थी श्री.रायभान किसन उघडे व बहुतांश उत्तरवादी उपस्थित आहेत. तसेच अपिलार्थी श्रीमती मंगला रायभान उघडे व श्रीमती सुरेखा कृष्णा पवार यांच्यावतीने श्री.रायभान किसन उघडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी वर नमूद जन माहिती अधिकारी यांच्याकडे जोडपत्र अ नुसार माहिती अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १३७ | 23.01.2021 | मौजे मुलानी वडगाव येथील जमिनीचे फेर क्र.1004,1005 व 280 संपूर्ण संचिका प्रती |

| | | |
|---|---|---|
| १३८,<br><br>१५२ | 23.01.2021<br><br>28.06.2021 | 1. आपल्या कार्यालयाचे पत्र जा.क्र.2017/सा.शा./निवेदन/131, 133, 130, 157, 158 व 196, दि.20.04.2017, सदर पत्रावरील कार्यवाही अनुपालन प्रती<br>2. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.जिपऔ/4 पंचायत/2021/2222/374, दि.14.06.2021 / दि.21.06.2021 एकाच प्रकरणी वारंवार अर्ज केलेल्या अर्जाच्या प्रती (जोडपत्र अ) |
| १३९,<br><br>१५९,<br><br>१६० | 30.01.2021<br><br>10.08.2021<br><br>09.09.2020 | 1.आपल्या कार्यालयाची (विकास शाखा) दि.23.03.2016 मधील नमूद मुद्याची माहिती देण्यात यावी,<br>2.विभागीय लोकशाही दिनातील तक्रार टोकन 09/2016, आपल्या कार्यालयाची टिपनी दि.03.05.2016 मधील माहिती,<br>3. कार्यालयाची कार्यालयीन टिपनी दि.07.06.2016 तक्रार टो.क्र.43 बाबत माहिती |
| १४०,<br><br>१४६,<br><br>१४७,<br><br><br><br>१४९,<br><br>१५६ | 30.01.2021<br><br>26.04.2021<br><br>28.04.2021<br><br><br><br>27.06.2021<br><br>16.07.2021 | 1.विभागीय आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र.2020/मशाका/जमीन-2/कावि, दि.08.07.2020 सदर प्रकरणी केलेल्या चौकशी व कार्यवाही अहवाल प्रती,<br>2.अर्जदाराचे दि.16.03.2020, दि.22.02.2021 चे पत्रावरील संपूर्ण कार्यवाही अहवाल कार्यालयीन टिपणीसह,<br>3. अपर जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयातील संचिका क्र.97/अपील एमएलआरसी 98, निर्णय दि.29.12.1999 प्रकरण महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 247 अन्वये अपील, वादी श्रीमती मंगला उघडे, प्रतिवादी मोहन व इतर या संचिकेचे संपूर्ण दस्ताऐवज (पृष्ठ)<br>4.अर्जदाराचे गोपनिय पत्र क्र.218 दि.22.06.2020 पत्रावरील कार्यवाही अहवाल,<br>5. आपले कार्यालयाचे प त्र क्र.2020/अपील/माअ/कावि-89, दि.03.06.2021 पत्रात आढळ होत नसलेल्या संचिका क्र.94/अ/एमएलआरसी/98, निर्णय दि.29.12.1999 मंगला रायभान उघडे विरुध्द मोहन व इतर बाबत सदर संचिका नियमानुसार जतन करणेसाठीचा तपशिल, |
| १४१,<br><br><br><br><br><br>१४५,<br><br>१४८,<br><br>१५०, | 22.02.2021<br><br><br><br><br><br>26.04.2021<br><br>28.06.2021<br><br>28.06.2021 | 1.मा.राज्य माहिती आयुक्त खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे समोरील दि.10.02.2021 चे व्दितीय अपील वरील सुनावणीतील अपील क्र.7608/19, 7609/19, 7874/19, 7880/19, 7883/19, 9762/19, 9763/19, 9766/19, 9767/19 बाबत आपल्या कार्यालयाचे पत्र दि.31.03.2020 चे 10 पत्र, सदर पत्रातील शपथपत्र देण्यासाठी संबंधित जमाअ यांना देण्यात आलेले पत्र व पोचपावत्या प्रती,<br>2.राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर अपील क्र.3329/2017, दि.17.11.2017, जावक क्र.18732, दि.15.12.2017 मधील आयोगास सादर केलेले शपथपत्राची प्रत,<br>3.गाव नमुना सात मधील मुलानी वडगाव ता.पैठण येथील गट नं. व उपवि 96/4 बाबत,<br>4.उपविभागीय अधिकारी कार्यालय पैठण फुलंब्री यांचे आपले कार्यालयास वर्ग केलेले दि.20.07.2018, 16.09.2020, 17.05.2021, 17.05.2021 बाबत (एकाच दिवशी फेर क्र.1004 व 1005 बेकायदेशीर नोंद) चौकशी व दोषी विरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत पत्रावरील कार्यवाही, |

| | | |
|---|---|---|
| १५१,<br>१५४, | 27.06.2021<br>07.07.2021 | 5. मौजे मुलानी वाडगाव ता.पैठण येथील जमिनीबाबत फेरफारची माहिती<br>6.जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे दि.13.03.2018, दि.18.04.2018 तसेच उप.वि.अधिकारी पैठण फुलंब्री यांचे दि.28.03.2018, दि.18.05.2018 पत्रावरील कार्यवाही अहवाल, |
| १५५, | 05.07.2021 | 7. आपले कार्यालयाकडील पत्र दि.17.06.2015 जा.क्र.2015/जमा-2/लोदि बाबत अहवाल व संपूर्ण संचिका, |
| १५७, | 06.09.2021 | 8. उप.वि. अधिकारी पैठण फुलंब्री यांचे पत्र क्र.2017/जमा/कावि/686, दि.27.04.2017 व पत्र क्र.2020/जमा/माअ/1721 सदरील पत्रावरील कार्यवाही अहवाल, |
| १५८, | 04.09.2021 | 9. आपले कार्यालयाचे पत्र क्र.2021/भूसुधार/कुळ/कावि/309 व 315, दि.20.08.2021 पत्रातील माहिती, |
| १६१ | 08.09.2021 | 10. उप.वि.अधिकारी पैठण फुलंब्री यांचे पत्र क्र.969, दि.07.07.2020 व जमा कावि 1637, दि.28.10.2020 कार्यवाही अहवालसह संपूर्ण माहिती, |
| १४२ | 23.02.2021 | मौजे धनगाव ता.पैठण येथील गट क्र.40, फेर क्र.1499, 1737 बाबतची संचिका प्रत |
| १४३<br><br>१४४ | 05.02.2021<br><br>23.02.2021 | 1. अपर तहसिलदार कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.2019 / जमा2/कावि-1180, दि.18.11.2019, सदरील पत्रावरील कार्यवाही अहवाल,<br>2. मौजे करोडी ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र.70 वरील जनार्धन शिंदे यांचे नावावरील प्लॉट क्र.345, 346, 538 व 539 चे फेर क्र.565 व सुधाकर मोरे यांचे नावावरील प्लॉट क्र.519, 520, 525 व 520 चे फेर क्र.570 ची संचिका, |
| १५३ | 16.07.2021 | अपर जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयातील संचिका क्र.94/ अपील/एमएलआरसी - 98 निर्णय दि.29.12.1999 मधील आपल्या कार्यालयाची संचिका क्र.93/अपील/आरओआर/सिआर10, दि.13.05.1994, तसेच संचिका क्र.94/अपील/ एमआरसी 98, निर्णय दि.29.12.1999 च्या संचिका प्रती |

"अद्यापी माहिती अप्राप्त" असे कारण नमुद करुन अपिलार्थी यांनी जोडपत्र "क" नुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे विचाराधिन द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी श्री.रायभान किसन उघडे यांनी अवगत केले की, आज रोजी आयोगासमोर प्रस्तावित असलेल्या २५ व्दितीय अपिलातील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप परिपूर्ण स्वरुपात प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे सर्व जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास तसे वस्तुस्थितीसह कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित बहुतांश जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती तसेच माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी

यांना अवगत केलेली आहे. अपिलार्थी एकाच विषयावर विविध प्राधिकरणांकडे जसे तलाठी कार्यालय, तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद इ. वारंवार माहितीचे अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांची संख्या मोठी व माहिती अर्जातील विषय क्लिष्ट स्वरुपाचा असल्यामुळे अशी माहिती एकत्रित करण्याकरिता अतिरिक्त वेळ खर्ची करावा लागतो व त्याचा विपरित परिणाम कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर होतो. असे जरी असले तरी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्या-त्या वेळी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जांव्दारे मागणी केलेली विस्तृत स्वरुपाची असुन अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेल्या माहितीचा कालावधी जुना (साधारणत: २० ते २५ वर्षापूर्वीचा) आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) कळविण्यात यावे.

२. सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह सर्व व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र.व्दि.अ.४४०७,४४०८---,११८८१(२५ व्दितीय अपिले)/२०२१/एस/ २७०६ दि. ०६/०३/२०२४